# सहकार्यात्मक अध्ययनातील युग्म विचार पद्धती

**परदेशी संगीता लक्ष्मणसिंह**
गोखले एज्युकेशन सोसायटीचे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,संगमनेर.

## प्रस्तावना

एकविसाव्या शतकात प्रवेश करताना अनेक राष्ट्रांना राजकीय सामाजिक, आर्थिक, तांत्रिक आणि शैक्षणिक बदलांचा सामना करावा लागत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावाने जग हे छोटे बनले आहे. जगाच्या एखाद्या भागात काही क्रिया घडली तरी जगाच्या इतर भागात त्याचा प्रभाव पडतो यामुळे जगभरातील व्यक्ती आणि समुदायांना एकत्र येऊन एकमेकांवर अवलंबून राहणे गरजेचे बनले आहे. जगभरातील देशांना यश मिळवायचे असेल, तर इतरांशी सहकार्य करणे आवश्यक आहे. जागतिक कार्यशैलीत टिकून राहण्यासाठी सहकार्याने काम करण्याचे कौशल्य प्रत्येकाने आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे.

## विद्यार्थ्यांमधील सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षकांची भूमिका

वर्गातील विद्यार्थ्यांना सहकार्यात्मक अध्ययन याचे अनुभव देण्यासाठी शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. यामध्ये शिक्षक वर्गातील विद्यार्थ्यांचे सहकार्यात्मक अध्ययन यासाठी गट करणे, गटांमध्ये नेमके कोणते कार्य करायचे ? गटातील विद्यार्थ्यांचे वर्तन कसे असावे ? याबाबत मार्गदर्शन करतात. याबरोबरच छोट्या गटातील विद्यार्थ्यांच्या चर्चेदरम्यान त्यांच्यातील संवाद वाढविण्यात शिक्षकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संवाद साधण्यास आणि एकत्रितपणे कार्य करण्यास मदत केल्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ एकमेकांकडून शिकायला मिळते असे नाही, तर त्यांना गटात दिलेली कार्य पूर्ण करण्यास व गटात त्यांनी घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारण्यास देखील सक्षम करतात.

व्याख्यान पद्धतीत विद्यार्थी स्वतः उस्फूर्तपणे विचार करणारे प्रश्न विचारत नाही. आपले पूर्वज्ञान नवीन ज्ञानाशी जोडत नाही. एखाद्या घटनेचे वर्णन करू शकत नाही, परंतु जेव्हा विद्यार्थ्यांना एकत्रितपणे बोलण्यास आणि तर्क करण्यास शिकवले जाते, याचबरोबर गटातील चर्चेमुळे विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरण करण्यास सक्षम करतात.

सहकार्यात्मक अध्यापनाची संकल्पना ही प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आहे. गुरुकुल पद्धती पासून ही संकल्पना सुरू झालेली आहे. महाभारतातील एका श्लोकानुसार विद्यार्थ्यांचे एक चतुर्थांश प्रशिक्षण अध्यापकाकडून होते, एक चतुर्थांश स्व अध्ययनातून होते, एक चतुर्थांश सहकारी विद्यार्थ्याकडून होते. यामुळेच आंतरक्रिया संबंधातून अधिक चांगल्या पद्धतीने विद्यार्थी शिकतात. सहकार्यात्मक अध्ययन हि अध्यापनात संबंधीची अशी कार्यनिती आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे छोटे छोटे गट केले जातात. या गटांमध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी विविध प्रकारच्या कृती दिल्या जातात. विविध क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक गट तयार केला जातो.

गटांमधील प्रत्येक विद्यार्थी सक्रियपणे अध्ययन करण्यास आणि आपल्या गटातील इतर सहकाऱ्यांना मदत करण्यास बांधील असतो. विद्यार्थ्यांचे सहकार्यात्मक अध्ययन घडून यावे यासाठी वर्गात वेगवेगळ्या कृतींचे आयोजन केले जाते. त्यापैकी युग्म विचार पद्धती ची माहिती आपण या लेखात घेणार आहोत.

**युग्म विचार पद्धती**

गप्पा मारणे ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. दोन व्यक्ती एकमेकांशेजारी बसल्या की त्यांच्या मध्ये आपोआप गप्पा सुरू होतात, अपरिचित व्यक्तींमध्ये ही गप्पा सुरू होतात. या गप्पांमधून एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण होते. शैक्षणिक बाबींमध्ये या गप्पांचा आपण अध्ययन अध्यापनात उपयोग करून घेऊ शकतो, यालाच युग्म विचार पद्धती म्हणतात. इंग्रजीमध्ये याला थिंक-पेयर-शेअर असे म्हणतात. पूर्व संशोधनातून हे सिद्ध झाले आहे की, विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनाच्या वातावरणात एकमेकांशी बोलण्याची संधी दिली, तर त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या कल्पनांचा विस्तार करण्याची संधी मिळते आणि यातून त्यांचे अध्ययन समृद्ध होण्यास मदत होते.

**युग्म विचार कार्यनितीच्या पायऱ्या**

युग्म विचार कार्यनिती च्या पायऱ्या खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील

**1. विचार करणे:-** विचार करण्याच्या पायरी मध्ये विद्यार्थ्यांना आशयाशी संबंधित एखादी समस्या किंवा प्रश्न दिला जातो. या समस्येवर किंवा प्रश्नावर विचार करण्यासाठी आशयाच्या स्वरूपानुसार वेळ दिला जातो. विद्यार्थी आपापल्या क्षमतेनुसार त्या समस्या किंवा प्रश्नांवर विचार करतात.

**2. जोड्या करणे:-** विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळेत समस्या किंवा प्रश्नावर विचार केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या जोड्या केल्या जातात. विद्यार्थ्यांच्या या जोड्या शिक्षक सहेतुक पद्धतीने करतात. या जोड्या भिन्न क्षमतेचे किंवा भिन्न स्वभावाच्या विद्यार्थ्यांच्या जोड्या सहेतुक पणे केले जातात. याचबरोबर विद्यार्थ्यांना अधिक स्वतंत्र देण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार जोड्या करण्याची संधी दिली जाऊ शकते. विद्यार्थ्यांच्या जोड्या झाल्यानंतर त्यांना आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी पुन्हा काही वेळ दिला जातो. या निर्धारित वेळेत विद्यार्थी आपल्या सहकाऱ्यांशी समस्या किंवा प्रश्नाच्या समाधान यावर चर्चा करतात. या पायरीमध्ये उपलब्ध विद्यार्थी संख्येनुसार चार ते पाच विद्यार्थ्यांचे गटही तयार करता येऊ शकतात.

**3. सामायिक करणे:-** गटात चर्चेसाठी दिलेला वेळ संपल्यानंतर विद्यार्थी आपल्या सहकाऱ्यांसोबत केलेल्या चर्चेतून जे विचार समोर आले ते सर्वांसमोर सादर करून सामायिक करतात. वर्गात जेवढ्या जोड्या असतील त्याचे गटप्रमुख गटातील चर्चा सर्वांसमोर प्रकट करतात.

**युग्म विचार पद्धतीत शिक्षकाची भूमिका**

1. युग्म विचार पद्धतीचा वर्गात वापर करण्यापूर्वी शिक्षकांनी पाठातील समस्या प्रश्न अगोदर तयार करून ठेवावेत.

2. या पद्धतीत विद्यार्थ्याला नेमके काय करायचे आहे हे शिक्षकांनी स्पष्ट करावे.

3. विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गातील सहकाऱ्यांची मदत घेऊन तंत्राचा वापर कसा करायचा हे स्पष्ट करावे.

4. हे तंत्र वापरताना विद्यार्थ्यांना काही अडचण आल्यास प्रश्न विचारण्यास सांगावे.

युग्म विचार पद्धतीचे आणखी प्रकार खालील प्रमाणे आहेत

1. विचार करा - लिहा - जोडी करा
2. सांगा - वाचा - लिहा - जोडी करा - सांगा
3. लिहा - जोडी करा - सांगा
4. द्विचार युग्म पद्धती

**युग्म विचार पद्धतीचे फायदे**

- विचार कार्यनिती वापरण्यास सोपी आहे.
- विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळेल असे प्रश्न विचारता येतात.
- वर्गातील प्रत्येक विद्यार्थी कार्यशील राहतो.
- विद्यार्थी स्वतःचा विचार करून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो.
- वर्गात कमी बोलणारे, लाजणारे, शांत स्वभावाचे विद्यार्थीही सहभागी होतात.
- विद्यार्थ्यांनी असे यासंदर्भात स्वतः विचार केल्याने तो असे विद्यार्थ्यांच्या कायमस्वरूपी लक्षात राहतो.

**युग्म विचार पद्धतीच्या मर्यादा**

- विद्यार्थ्याच्या चर्चेला आणि सृजनशीलतेला वाव मिळेल असे प्रश्न तयार करण्याचे आव्हान शिक्षकांसमोर असते.
- शिक्षकांना वेळेचे नियोजन करावे लागते.
- पूर्वनियोजन हा फार महत्त्वाचा घटक आहे पूर्व नियोजनाशिवाय विचार पद्धती यशस्वी होऊ शकत नाही.

अशाप्रकारे सहकार्यात्मक अध्ययनाच्या युग्म विचार पद्धतीचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया पार पाडता येते. पारंपारिक पद्धतीपेक्षा वेगळी व विद्यार्थ्यांना वर्गात अध्यापनात सक्रिय करून सहकार्याची एकत्र काम करण्याची भावना निर्माण होण्यासाठी योग्य विचार पद्धतीचा वापर करून शिक्षक आपले अध्यापन प्रभावी करू शकतात.

**संदर्भ ग्रंथ सूची**


- आगाशे, ललिता (2020). ***सहयोगी शिक्षण***, प्रज्ञार्थ प्रकाशन : पुणे.
- चव्हाण, गणेश (2012). ***वर्तमान शिक्षणातील आस्थेचे नवविचार प्रवाह*** इन्साइट प्रकाशन : नाशिक.
- जगताप, ह. ना. (2010). ***शिक्षणातील नवे प्रवाह व नवप्रवर्तन,*** नित्य नूतन प्रकाशन : पुणे
- कुमार, सुशील आणि पाथरे, नीला (2019). ***अध्यापनाच्या कार्यनिती*** प्रशांत पब्लिकेशन : जळगाव.